# सापळा लावून चैनस्नॅचिंग करणारे ताब्यात; २५ ग्रॅम सोने व दोन दुचाकी जप्त

**नांदेड–** शहरात मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलांच्या गळ्यातील गठण दुचाकीवरून हिसकावून पळ काढणाऱ्या दोन युवकांसह एक विधीसंघर्ष बालकाला शिवाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून २५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यासह दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

शहरात दि.२९ मे रोजी सकाळी सातच्या सुमारास अनोळखी तिघांनी दुचाकीवरून रेल्वेस्टेशन ते यशवंत महाविद्यालय रस्त्यावर मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे गठण जबरीने हिसकावून पळ काढला होता.

या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचप्रमाणे दि. चार जून रोजी सकाळी साडेसहा वाजताचे दरम्यान मगनपुरा नविन मोंढा येथील प्रमुख रस्त्यावर मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याचे शॉर्ट गंठण हिसकावू नेले होते. याप्रकरणीही गुन्हा दाखल झाला आहे. होउन सतत एका पाठोपाठ दोन घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांनी पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांना त्वरीत गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले होते. पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांनी दि. पाच जून रोजी गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना नेमून सकाळी पाचपासून पोलीस स्टेशन हद्दीत नियमित चैन स्नॅचिंग होत असलेल्या परिसरात सापळा लावण्याचे आदेश दिले. दरम्यान, सकाळी तिन संशयीत इसमांच्या दुचाकींचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्यांनी वरील दोन्ही घटना केल्याचे कबूल केले. आरोपी ओंकार उर्फ विराट राजेश भुमक (वय २३ वर्ष रा. पांगरी ता. जि. नांदेड) व अर्जुन पुरूषोत्तम मोरे (वय २३ रा. विष्णुनगर नांदेड) व विधीसंघर्षग्रस्त बालक यांच्या ताब्यातून दोन्ही गुन्ह्यांतील जबरीने चोरलेले सोन्याचे गंठण व एक शॉर्ट गंठण व तुटलेल्या गंठणाचा भाग असा एकूण २५ ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल (सव्वा लाख) व दोन दीड लाख रूपयांच्या दुचाकी जप्त केल्या. पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उप निरीक्षक मिलींद सोनकांबळे, व अंमलदार शेख इब्राहीम, दिलीप राठोड, रविशंकर बामणे, देवसिंग सिंगल, शेख अझहर, दत्ता वडजे, विष्णु डफडे यांनी ही कामगिरी पार पाडली.

# महिलेचे गठण चोरणाऱ्या तिघांना अटक

**नांदेड/प्रतिनिधी**

मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचे गठण धूम स्टाईल लंपास केल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांसह एका अल्पवयीन बालकालाही ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून दीड लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

दि. ४ मे रोजी सकाळी मगनपुरा परिसरातील एक महिला फिरायला म्हणून बाहेर पडली. त्याचवेळी पाळत ठेवून असलेल्या दुचाकीस्वाराने त्यांचा पाठलाग केला व संधी मिळताच महिलेच्या गळ्यातील २५ ग्रॅम वजनाचे गंठण लंपास केले. यासाठी त्यांना एका अल्पवयीन बालकानेही मदत केली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी दि. ५ जून रोजी गस्त घालत असताना दुचाकीवर संशयास्पदरित्या फिरताना ओंकार राजेश भूमक (वय २३), अर्जून पुरषोत्तम मोरे याच्यासह अल्पवयीन बालकालाही ताब्यात घेतले. चौकशी केल्यानंतर त्यांनी महिलेचे गंठन लंपास केल्याची कबुली दिली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी दोन दुचाकीसह दीड लाख रुपयाचा ऐवज जप्त केला.